## (B) समाजशास्त्राच्या विकासाचा थोडक्यात आढावा.
## (Brief outline of Development of sociology)

प्रस्तावना -

मानवी समाजाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करण्यास 19 व्या शतकामध्ये समाजशास्त्र या विषयाच्या माध्यमातून प्रारंभ झाला त्यामुळे समाजशास्त्र हे एक आधुनिक शास्त्र आहे परंतु मानवी समाजाचा अभ्यास सामाजिक विचारांचा इतिहास हा खुप प्राचीन आहे प्राचीन काळापासुन मानव, समाज, संस्कृती याविषयी विचार स्पष्ट करत असेला आहे अशा विचारांना समाजशास्त्राच्या उदयाने शास्त्रीय पद्धतीची जोड मिळाली प्राचीन काळपासुन स्पष्ट करण्यात आलेल्या सामाजिक विचारांच्या पार्श्वभूमीमधूनच समाजशास्त्राचा उदय आणि विकास झालेला आहे या विकासाचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे -

① सामाजिक विचारांची पार्श्वभूमी -

मानवी समाजाविषयी मानवाने स्पष्ट केलेले विचार हे मानवी समाजाइतकेच प्राचीन आहेत प्राचीन व मध्ययुगीन काळात अनेक विचारवंत, महाकवी, धर्मसंस्थापक यांनी समाज, संस्कृती या विषयी विचार मांडले होते. बॅबिलोनियन संस्कृतीमधील राजा हामुराब्बी याने त्याच्या 'कायदेसंहिता' या ग्रंथात समाजाविषयी विचार स्पष्ट केलेले होते. प्रसिद्ध ग्रीक विचारवंत प्लेटो यांनी 'Republic' या ग्रंथात सामाजिक घटना घटनांचे विश्लेषण केलेले होते. ॲरिस्टॉटल या विचारवंताने नितीशास्त्र आणि राज्यशास्त्र (Ethics and Politics) या ग्रंथामध्ये समाज, राज्य, न्याय

व्यवस्था या संबंधी विचार मांडलेले आहेत. याशिवाय अनेक परकीय विचारवंतानी प्राचीन काळापासुन समाजाविषयी विचार मांडलेले आहे.

भारतात देखिल प्राचीन साहित्यात सामाजिक विचार दिसून येतात. वेद, उपनिषदे, सुत्रे, पूराणे, रामायण, महाभारत या सारख्या ग्रंथांमधुन सामाजिक जीवनाविषयीची माहिती, तत्वज्ञान मिळते. कौटिल्याचे अर्थशास्त्र व शुक्राचार्यांचे नितीसार या ग्रंथामध्ये देखिल समाज, अर्थव्यवस्था, प्रशासन या संबंधी विचार स्पष्ट केलेले आहेत.

वरील सर्व विचार हे मानवी समाजांशी संबधीत असले तरी हे विचार म्हणजे एक प्रकारचे मुक्त चिंतन आहे. व्यक्तीनिष्ठ व आदर्शवादी विचार आहेत. या विचारांमध्ये कल्पनाशक्ती, स्व:धर्म, स्वसंस्कृती याला विशेष महत्व दिले आहे. या विचारामध्ये शास्त्रीय पदधतीचा अवलंब केला नसल्यामुळे हे विचार सामाजिक विचार ठरतात. त्याला समाजशास्त्रीय विचार म्हणता येत नाही. परंतु यात सामाजिक विचारामधून निर्माण झालेली पार्श्वभूमी समाजशास्त्राच्या विकासासाठी उपयुक्त ठरलेली आहे.

② समाजशास्त्राच्या उदयाची पार्श्वभूमी.

समाजशास्त्राचा उदय जरी 19 व्या शतकामध्ये झाला असला तरी त्यासाठी आवश्यक असणारी पार्श्वभूमी, परिस्थीती 17 व्या व 18 व्या शतकात निर्माण झालेली होती. या कालावधीत बौद्धिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रात जे बदल घडून आले त्याचाच परिणाम समाजशास्त्राचा उदय झाला.

हे बदल किंवा घटना पुढीलप्रमाणे -

१) बौद्धीक क्षेत्रातील विकास -

संपुर्ण विश्वामध्ये १७ व्या व १८ व्या शतकात बौद्धीक क्षेत्रात लक्षणीय विकास घडून आला. परंपरावादी धार्मिक विचारसरणी मागे पडून अनुभवनिष्ठ शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करण्यास सुरुवात झाली. यालाच सामाजिक प्रबोधनाचा कालखंड म्हणुन ओळखले जाते. भौतिक विश्व, सामाजिक जिवन याच्याकडे लोकांचा पाहण्याचा दृष्टिकोन बदलु लागला. बौद्धिक क्षेत्रात हा बदल करण्यामध्ये तर्कसंगत विचारांना चालना देण्यामध्ये हॉब्ज, लॉक, रुसो यासारख्या अनेक विचारवंताचे योगदान महत्वपुर्ण ठरलेले आहे. बौद्धिक क्षेत्रात झालेल्या विकासामुळे अंधश्रद्धा, प्रथा, परंपरा मागे पडून शास्त्रीय विचारांना गती प्राप्त झाली.

२) शास्त्रीय / वैज्ञानिक पद्धतीचा उदय -

प्रबोधन काळात अनेक संशोधकाने निरीक्षण, प्रयोग, परीक्षण याच्या साहाय्याने नैसर्गिक शास्त्रामध्ये संशोधन करुन अनेक शोध लावणे त्यामधूनच वैज्ञानिक किंवा शास्त्रीय पद्धतीचा उदय झाला. वस्तुनिष्ठ पद्धतीचा वापर करुन अभ्यास केला जाऊ लागला. या पद्धतीचा प्रभाव सामाजिक विचारवंताच्यावरती देखिल पडला. समाजाचे वस्तुनिष्ठ ज्ञान मिळवण्यासाठी शास्त्रीय पद्धतीचा बुद्धी प्रमाण्यवादाचा अवलंब केला पाहिजे. असे वाटू लागल्याने यामधुनच समाजशास्त्राच्या उदयाची पार्श्वभुमी तयार झाली.

३) सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रातील घडामोडी

युरोपमध्ये १७ व्या व १८ व्या शतकात अनेक क्रांतीकारी घटना घडल्या त्या घटण्याचा



Scanned with CamScanner

परिणाम समाजव्यवस्थेवरती झाला. त्याचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास केला केला पाहिजे. असा विचार समोर आला. त्यामुळे समाजशास्त्राच्या विकासामध्ये 17 व्या व 18 व्या शतकातील सामाजिक, राजकीय व आर्थिक जीवनातील घडामोडी महत्वाच्या ठरलेल्या आहेत.

फ्रेंचराज्यक्रांतीने मानवी संघर्षाच्या इतिहासाला वेगळी दिशा मिळाली. या क्रांतीमुळे सामाजिक व राजकीय जीवनात परिवर्तन घडून आले. स्वातंत्र्य, बंधुता, समता हा विचार संपूर्ण विश्वा समोर आला. या क्रांतीमुळे बुद्धीप्रमाण्यवाद विस्तारित होण्यास मदत झाली.

17 व्या शतकातील दुसरी महत्वाची क्रांतीकारी घटना म्हणजे औद्योगिक क्रांती होय. या क्रांतीमुळे सामाजिक व आर्थिक जीवनात आमुलाग्र बदल घडून आले. उत्पादनाची नवीन पद्धत, तंत्रे उदयास आली. भांडवलशाही व्यवस्थेचा उदय झाला. त्यामधुनच कामगार आणि मालक हे दोन वर्ग उदयास आले.

औद्योगिक क्रांतीमुळे नागरीकरणाला गति मिळाली. या सर्व घटनांबरोबर दारिद्र्य, कामगारांच्या समस्या अशा अनेक सामाजिक समस्या निर्माण झाल्या. या समस्यांच्या व सामाजिक घटकांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करण्याची गरज निर्माण झाल्याने 19 व्या शतकाच्या प्रारंभी समाजशास्त्राचा उदय झाला.

## (3) समाजशास्त्राच्या विकासातील समाज शास्त्रज्ञांचे योगदान -

समाजशास्त्राच्या अभ्यासाला प्रामुख्याने 19 व्या शतकात सुरुवात झाली. या शतकापासून ज्या विचारवंतानी, समाजशास्त्रज्ञांनी आपल्या विचारांच्या माध्यमातून समाजशास्त्राच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. त्याच्या कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे -

(1) ऑगस्त कॉम्त -

प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ फ्रेंच विचारवंत ऑगस्त कॉम्त यांनी सन 1839 मध्ये समाजशास्त्र (sociology) ही संकल्पना सर्वप्रथम स्पष्ट केली. (Positive philosophy) आणि (Positive Polity) या महत्त्वपूर्ण ग्रंथाची त्यांनी निर्मिती केलेली आहे. भौतिक घटनांचा जसा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास केला जातो. तसाच अभ्यास सामाजिक घटनांचा देखिल झाला पाहिजे. हा विचार त्यांनी सर्वप्रथम स्पष्ट केला.

मानवाच्या बुद्धीमत्तेचा विकास हा स्पष्ट करताना ऑगस्त कॉम्त यांनी 'तीन अवस्थांचा नियम' स्पष्ट केलेला आहे. तो पुढीलप्रमाणे.

(A) धर्मशास्त्रीय अवस्था

(B) अध्यात्मीक अवस्था

(C) प्रत्यक्षवादी अवस्था.

ऑगस्त कॉम्त याने समाजशास्त्राच्या अभ्यासविषयांची दोन क्षेत्रे स्पष्ट केलेली आहेत. ती पुढीलप्रमाणे -



Scanned with CamScanner

Ⓐ सामाजिक स्थितीशास्त्र
Ⓑ सामाजिक गतीशास्त्र

ऑगस्त कॉम्त यांनी प्रत्यक्षवाद (विज्ञानवाद) या संकल्पनेचा पुरस्कार केला. कॉम्त यांच्यामते समाजशास्त्र हे उपयोजित शास्त्र आहे. समाशास्त्राच्या विकासामध्ये वरील प्रमाणे महत्वपूर्ण विचार स्पष्ट करून जो योगदान दिलेले आहे. त्यामुळेच ऑगस्त कॉम्त यांना समाजशास्त्राचे जनक (Father of sociology) म्हणून ओळखले जाते.

② कार्ल मार्क्स - (जर्मन शास्त्रज्ञ)

कार्ल मार्क्स संघर्षवादी विचारांचा प्रणेता. एक क्रांतिकारक विचारवंत म्हणून कार्ल मार्क्स यांना ओळखले जाते. 19 व्या शतकात जगातील कामगारांना एकत्र करुन भांडवलशाही विरोधात आवाज उठवणारा महान तत्वज्ञ म्हणून देखिल कार्ल मार्क्स यांना ओळखले जाते. कार्ल मार्क्स आणि त्याचा मित्र ~~फ्रेडीक~~ फ्रेडरिक एंजल्स या दोघांनी समाज शास्त्रीय संशोधन करून समाजशास्त्राच्या विकासात महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे. कार्ल मार्क्स यांनी आर्थिक घटकाना आपल्या विचारांमध्ये अधिक महत्व दिलेले आहे. उत्पादन-संबंध व साधने या आधारे भांडवलदार व कामगार हे दोन वर्ग त्यांनी स्पष्ट केले

imp The Poverty of Philosophy, Das Capital हे कार्ल मार्क्स यांचे महत्वपूर्ण ग्रंथ आहेत. यामध्ये त्यांनी वर्गसंघर्ष सिद्धांत, ऐतिहासिक भौतिकवादाचा सिद्धांत, द्वंद्वात्मक भौतिक



Scanned with CamScanner

वाद, भांडवलशाहीच्या विकास, अतिरिक्त मुल्य, अलगतेचा सिद्धांत, साम्यवादी राज्यांची संकल्पना हे महत्वपूर्ण सिद्धांत स्पष्ट करून समाजशास्त्राच्या विकासामध्ये महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे

③ हर्बर्ट स्पेन्सर -

19 व्या शतकातील प्रसिद्ध विचारवंत हर्बर्ट स्पेन्सर यांचा उल्लेख संरचनात्मक समाजशास्त्रज्ञ असा केला जातो. (Principles of sociology) या महत्वपूर्ण ग्रंथाची निर्मिती स्पेन्सर यांनी केली. त्यांनी समाजशास्त्राचा अभ्यासविषय (कुटुंब, धर्म, राज्य, सामाजिक नियंत्रण, सामाजिक स्तरीकरण इ.) स्पष्ट करून तो अभ्यास शास्त्रीय पद्धतीने केला पाहिजे. ही भूमिका स्पष्ट केली. स्पेन्सर यांनी मानवी समाजाविषयीचा उत्क्रांतीवादी सिद्धांत आणि सेंद्रिय सिद्धांत स्पष्ट केला. सामाजिक संघटनावर आधारित सैनिकी समाज व औद्योगिक समाज हे समाजाचे दोन प्रकार स्पष्ट केले. हर्बर्ट स्पेन्सर यांनी आपल्या विकासवादी विचारांच्या माध्यमातून समाजशास्त्राचे अध्ययन समृद्ध केले असल्याने त्यांच्या विचारांना समाज शास्त्रामध्ये महत्वपूर्ण मानले जाते.

④ एमिल डरखिम / डुरखाईम -

समाजशास्त्रीय सिद्धांत विचार हे अनुभव निष्ठ संशोधनावर आधारित असले पाहिजे अशी एमिल डरखिम यांची भूमिका होती. The Rules of sociological method, Suicide, The Division of Labour. हे महत्वपूर्ण ग्रंथ

लिहिलेले आहेत. श्रमविभाजनाचा सिद्धांत, आत्महत्येचा सिद्धांत, धर्माचा सामाजिक सिद्धांत दुर्खिम यांचे समाजशास्त्रातील महत्त्वपूर्ण योगदान आहे.

⑤ मॅक्स वेबर -

समाजशास्त्र हे सामाजिक क्रियांचे अर्थपूर्णात्मक आकलन करून घेणारे शास्त्र आहे. सामाजिक घटनांच्या निर्मितीसाठी समाज हे प्रभावी कारण आहे. अशाप्रकारेचे विज्ञानवादी विचार वेबर यांनी स्पष्ट केले. सामाजिक क्रिया व प्रकार, नोकरशाहीविषयक सिद्धांत, अधिकाराचा सिद्धांत धर्मव्यवस्था आणि भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा विकास, राजकीय समाजशास्त्र, आदर्श प्रकार इ. मॅक्स वेबर यांचे विचार व सिद्धांत यांनी समाजशास्त्राच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे.

सारांश -

२१ व्या शतकामध्ये विश्वभर महत्त्वाचे सामाजिक शास्त्र म्हणून समाजशास्त्राला मान्यता मिळालेली आहे. मानवी समाजाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणारे शास्त्र अशी लोकप्रियता लाभली आहे. अशा शास्त्राचा म्हणजेच समाजशास्त्राचा उदय आणि विकास वरील प्रमाणे घडून आलेला आहे.